ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

**No,CGRF/AZ/U / 189 / 2009 / 23 /** **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

**Sub:- Forwarding of grievance in respect Shri Subhashchandra Govindrao Kulkarni, 27-B. Rachnakar Colony, Railway Station, Aurangabad. (Consumer No. 490011217262).**

**Dear Sir,**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Subhashchandra Govindrao Kulkarni, 27-B. Rachnakar Colony, Railway Station, Aurangabad.**

**You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with related documents**.

**The hearing in this matter is kept on 03/03/2009 at 12=15 Hrs**.

**Encl: As above**

**Member/Secretary**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

Copy to:-
**Shri Subhashchandra Govindrao Kulkarni,**
**27-B. Rachnakar Colony,**
**Railway Station,**
**Aurangabad.**

**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.**

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८९/२००९/२३**

**तक्रार दाखल दिनांक ;- २५/०२/२००९**
**निकाल दिनांक ;- ०७/०३/२००९**

**श्री सुभाषचंद्र गोविंदराव कुलकर्णी,**
**२७ रचनाकर कॉलनी रेल्वेस्टेशन रोड,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११२१७२६२) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २५/०२/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०३/०३/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदार यांनी महावितरण वीज कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांना २००८ पासुन सतत चुकीच्या वीज बिलाची आकारणी करण्यात येत आहे. या चुकीच्या वीज बिलाची दुरूस्ती करून सुधारीत वीज बिल देण्याची विनंती त्यांनी महावितरण कंपनीच्या संबंधीत विभागाकडे केली. पण त्यांच्या तक्रारीची कोणतीही दखल घेण्यात न आल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन महावितरण कंपनीस सुधारीत वीज बिल देण्याबाबत तसेच नुकसान भरपाई देण्याबाबत आदेश देण्याची विंनंती मंचास केली आहे. अर्जदाराने या चुकीच्या वीज बिलापोटी त्याचा वीज पुरवठा खंडित न करण्याबाबत महावितरण कंपनीस अंतरिम आदेश देण्याची विनंती आपल्या तक्रारीत केली आहे.

२) दिनांक ०३/०३/२००९ रोजी अर्जदार श्री सुभाषचंद्र कुलकर्णी उपस्थित होते. महावितरण कंपनीतर्फे नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर उपस्थित होते. त्यांनी या प्रकरणाची कागदपत्रे संबंधित विभागाकडुन उपलब्ध झाली नसल्याचे सांगत कोणताही जवाब मंचात दाखल केला नाही.मंचाने महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास देण्यात आलेल्या वीज बिलाची पाहणी केल्यावर अर्जदारास मीटर रिडिंगप्रमाणे वीज बिल आकारण्यात आले नसल्याचे दिसुन आले. अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या तक्रारीचे निवारण होईपर्यंत त्याचा वीज पुरवठा खंडित करू नये असा अंतरिम आदेश मंचाने महावितरण कंपनीस दिला व पुढील सुनावणी दिनांक ०७/०३/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक ०७/०३/२००९ रोजी अर्जदार व महावितरणचे नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदारास चुकीचे वीज बिल देण्यात आल्याचे मान्य केले व सुधारीत वीज बिल देण्याबाबतचा प्रस्ताव मंचात दाखल केला ज्यात अर्जदारास वीज बिलातुन १३१४३.५५ रूपये कमी करण्यात येईल असे म्हटले आहे. सदरील सुधारीत वीज बिल प्रस्तावाची प्रत अर्जदारास देण्यात आली. अर्जदाराने सदरील सुधारीत वीज बिल मान्य असल्याचे सांगितले.

४) मंचाने दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागदपत्रावरून व नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या सुधारीत वीज बिल प्रस्तावाची पाहणी केल्यावर ते योग्य असल्याचे आढळुन आले. अर्जदाराने मंचात दाखल केलली तक्रार योग्य असुन त्यांना महावितरण कंपनीतर्फे ऑक्टोबर २००८ पासुन सरासरीवर आाधारीत वीज बिलाची आकारणी करण्यात आल्याचे स्पष्ट होते.अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे.

## आदेश

१) महावितरण वीज कंपनीने अर्जदारास बिल रिव्हीजन प्रस्तावाप्रमाणे १३१४३.५५ रूपयाचे क्रेडीट देवुन ३० दिवसात सुधारीत वीज बिल द्यावे.

२) वरील प्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारू नये.

३) महावितरण कंपनीने अर्जदारास रूपये २५०/-नुकसान भरपाई ३० दिवसांत द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८९/२००९/२३** **दिनांक ;-**

**प्रति,**

**श्री सुभाषचंद्र गोविंदराव कुलकर्णी,**
**२७ रचनाकर कॉलनी रेल्वेस्टेशन रोड,**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१८९/२००९/२३ )

आपण दिनांक २५/०२/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**